## जनसंपर्क विभाग

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/16/बातमी/ईमेल/2020 दिनांकः- 31.8., 2020

जळगाव दि.३१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्था / प्रशाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशाची मुदत वाढवून देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था सध्या बंद आहेत. प्रथम वर्ष वगळता उर्वरित अभ्यासक्रम १ ऑगस्ट पासून सुरु झाले आहेत. कोरोनाचा प्रादूर्भाव अद्याप संपला नसल्यामुळे विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय / परिसंस्था / प्रशाळांमध्ये प्रवेशाची सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जुलै महिन्यापासून ही प्रवेश प्रक्रीया सुरु झालेली आहे. कोरानाच्या प्रादूर्भावामुळे आणि सतत सुरु असल्यामुळे पावसामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील बऱ्याच महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला दिसून येत नाही. त्यामुळे विद्यापीठाने नव्या शैक्षणिक वर्षात प्रवेश देण्याचा कालावधी वाढवून दिला आहे. ३० सप्टेंबर पर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेता येणार आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

--------------------------------------------

**बातमी क्र. २**

जळगाव दि.३१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने मिशन बिगीन अगेन अंतर्गत ऑनलाईन विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सध्या कोरोनामुळे शैक्षणिक संस्था बंद आहेत. परंतू ऑनलाईन वर्ग घेऊन काही वेगळे प्रयोग केले जात आहेत. या अनुषंगाने आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालये व सामाजिक संस्थांना आवाहन केले आहे की, एखादा उपक्रम ऑनलाईन पध्दतीने आयोजित करावयाचा असल्यास तसा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा. या संदर्भात विभागाने कोणत्या प्रकारचे कार्यक्रम आयोजित करता येतील याची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे अशी माहिती विभागाचे प्रभारी संचालक प्रा.मनीष जोशी यांनी दिली.

--------------------------------------------------------------------------------

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०२० दिनांक : ३१.०८, २०२०

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

( सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी